**सं.फौ.ख.क्र ५७६/२०२३**
**अनिल वि. सुनिल**
**निशाणी क्रमांक : २१**

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ अनिल गजानन वालोकार यांचा उलट तपास आरोपीतर्फे अधिवक्ता एम.व्ही. मृग यांचेतर्फे शपथेवर सुरू :–</u>**

**०८.** माझे शिक्षण १२ पर्यंत झाले आहे. माझी १२ कोणत्या वर्षी झाली हे मला आठवत नाही. हे खरे आहे की, माझी घरची आर्थीक परिस्थीती हालाखीची असल्याने मी पूढील शिक्षण घेवू शकलो नाही. मी विदयुत फिंटींग व नळ फिटींग चे काम करतो. तसेच बी.ए.एम.एस. महाविदयालयात वायरमन म्हणून काम करतो. मी नळ फिटींग चे काम खूप वर्षापासून करतो. तसेच मी बी.ए.एम.एस महाविदयालयात मागील ४ वर्षापासून काम करतो. मी सदर विदयुत व नळ फिटींग कामाचे पूर्ण इमारतीचे कत्रांट घेतो.

**०९.** आरोपी पाणपट्टीचा व्यवसाय करत होता. हे खरे आहे की, मागील ४ ते ५ वर्षापासून आरोपीचा व्यवसाय बंद झाला व तो या गावात राहत नाही. आरोपीचे मूले काय कामधंदा करतात हे मला माहीत नाही. मी आरोपीच्या घरी कधीही गेलो नव्हतो. हे खरे आहे की, आरोपीच्या घराबाबत मला काहीही माहीती नाही. आरोपीचे संपूर्ण नाव मला माहीत नाही. मला आरोपीचे आईवडील व कूटूंबाबाबत माहीती नाही.

**१०.** मी आरोपीसोबत कोणताही करार केलेला नव्हता. आरोपी व माझ्यात पैशांची ब–याचवेळा देवाण घेवाण करणे असे काही झाले नव्हते. आरोपी व माझी ओळख भरपूर वर्षापासून होती. आरोपी व माझी ओळख निश्चीत कधी झाली हे मी सांगु शकत नाही. हे खरे नाही की, आरोपीने माझ्याकडे रकमेची मागणी कधी केली होती हे मी सांगु शकत नाही. आरोपीने मला दि. ०६.१०.२०२३ रोजी धनादेश दिला होता. आरोपीने त्याच दिवशी दि. ०६.१०.२०२३ रोजी माझ्याकडे रकमेची मागणी केली होती.

**११.** मी सदर धनादेश दि. ०६.१०.२०२३ रोजी नतंर दोन महीन्यांनी बँकेत वटण्यासाठी जमा केला होता. त्याची निश्चीत तारीख मी सांगु शकत नाही. मी धनादेश वटण्यासाठी जमा केल्यानंतर दोन ते तिन दिवसानतंर मला धनादेश परत मिळाला होता. हे खरे नाही की, आरोपीने मला कोणत्या शाखेचा धनादेश दिला हे मी सांगु शकत नाही. मी आरोपीला नोटीस किती तारखेला पाठविली हे माझ्या लक्षात नाही. सदर नोटीस आरोपीला कधी मिळाली हे माझ्या लक्षात नाही. न्यायालयात प्रस्तुत प्रकरण कधी दाखल केले हे मला माहीत नाही. हे खरे नाही की, प्रकरणात पुरावा कोणत्या तारखेला दाखल केला हे मला माहीत नाही. पुरावा दाखल केल्याची निश्चीत तारीख, वार मी आजरोजी सांगु शकत नाही. मी आरोपीला कोणत्या तारखेला पैशांची मागणी केली हे मी

सांगु शकत नाही.

**१२.** मी आरोपीला नोटीस पाठविल्यावर त्याचे काय झाले हे मला माहीत नाही. मी धनादेश क्रमांक सांगु शकत नाही. मी रिर्टनमेमो ची निश्चीत तारीख सांगु शकत नाही. माझ्याकडे माझ्या कथनानुसार रूपये दोन लाख असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा नाही. हे खरे आहे की, आरोपी याची पाणपट्टी चौकात पोष्टासमोर होती व ती चांगली चालत होती.

**१३**. माझे वार्षीक उत्पन्न चार ते पाच लाख रूपये इतके आहे. मी आयकर विभागाचे विवरणपत्र भरत नाही. हे खरे नाही की, मला वार्षीक उत्पन्न चार ते पाच रूपये असल्याचे मी चूकीचे सांगत आहे त्यामूळे मी आयकर विवरण भरत नाही. माझा वार्षीक खर्च अदांजे दिड ते दोन लाख रूपये इतका आहे. आरोपीची चौकात पाणपट्टी असल्याने व मी फिरस्तीवर काम करत असल्याने आरोपी व माझी चौकात चांगली ओळख झाली होती. हे खरे नाही की, मी आरोपीला पैसे देतेवेळी बॅंकेतून पैसे काढून आणले होते. हे खरे नाही की, मी आरोपीला रक्कम देण्यासाठी इतर कूणाकडून उसने घेतले होते. हे खरे आहे की, आरोपीला रक्कम देण्यापूर्वी सदर रक्कम माझ्याकडे जमा होती. सदर रक्कम माझे व माझ्या वडीलांच्या उत्पन्नातून जमा केलेली होती. सदर रक्कम रूपये ५०० व १०० च्या नोटा होत्या. त्यापैकी कोणत्या नोटा किती होत्या मी आजरोजी निश्चीत सांगु शकत नाही.

**१४.** सदर रक्कम मी स्वत: मोजली होती. मी आरोपीला रक्कम दिली व लगेचच त्याच्याजवळून धनादेश घेतला होता. आरोपीने धनादेशावरील संपूर्ण मजकूर स्वत: लिहला होता.

**<u>आरोपी यांच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरून व न्यायालयाची वेळ संपल्यामूळे पूढील उलटतपास पूढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आली.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/–
( एस. बी. मोरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पातूर

दिनांक – १२/०२/२०२६